दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १८९) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.२५ जुलै २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

## भारताची ऐतिहासिक झेप!; 'कुशा' मिसाईलची पहिली यशस्वी चाचणी

नवी दिली दि.२४ (वृत्तसंस्था)- भारत आपली हवाई सुरक्षा यंत्रणा आणखी मजबूत करण्यासाठी प्रयत्न करत आहे. या अनुषंगानेच भारत अनेक शक्तिशाली बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी करत आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर भारताने क्षेपणास्त्र तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे या क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी भारतासाठी महत्त्वाची मानली जात आहे.

भारताने आता संरक्षण क्षेत्रात आणखी एक महत्वाचा टप्पा गाठला आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओने 'कुशा' या लांब पल्ल्याच्या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली आहे. 'कुशा' ही भारताच्या हवाई संरक्षण व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाची हवाई संरक्षण प्रणाली मानली जात आहे. 'प्रोजेक्ट कुशा' या अंतर्गत संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने पुढील १२ महिन्यांत तीन 'इंटरसेप्टर' क्षेपणास्त्रांची चाचणी घेण्याचं ठरवलं आहे. यातील पहिली यशस्वी चाचणी २३ जुलै रोजी पार पडली आहे. आता पुढील १२ महिन्यांत १२० किमी ते ४०० किमी पल्ल्याच्या तीन 'इंटरसेप्टर' क्षेपणास्त्रांची चाचणी घेण्यात येणार आहे. या यशस्वी चाचण्यामुळे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यास आणि क्षेपणास्त्रांच्या आयातीमध्ये संरक्षण प्रणालींवरील देशाचं अवलंबित्व कमी करण्याच्या अनुषंगाने हे एक महत्वाचं पाऊल ठरणार आहे.

*आंदोलन मागे घेण्यासाठी सीजेपी सोबत सरकारची बैठक; तोडगा नाही*

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर सीजेपी ठाम; आज पुन्हा बैठक

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपर फुटी प्रकरणी सीजेपीने उभारलेल्या दिल्लीतील आंदोलनाला मोठा प्रतिसाद मिळाला असून हजारोंच्या संख्येने तरुण जंतरमंतरवर आंदोलन करत आहेत. याबरोबरच या आंदोलनाचे लोन अन्य राज्यातही पसरले. अनेक तरुण रस्त्यावर उतरुन आंदोलन करीत नीट पेपर फुटीला जबाबदार असलेल्या केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत आहेत. परंतु केंद्र सरकार राजीनामा घेण्याऐवजी अनेक क्लुप्त्या लढवून हे आंदोलन कसे शांत केले जाईल यासाठी सरसावले आहे. याच पार्श्वभुमीवर केंद्र सरकार आणि सीजेपीच्या नेत्यांमध्ये आज आंदोलन मागे घेण्यासाठी चर्चा करण्यात आली. परंतु धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीत आंदोलन मागे घेतले जाणार नाही. अशी भुमीका सीजेपीच्या वतीने घेत आणखी काही मागण्या सरकारसमोर ठेवल्या आहे. आजच्या बैठकीत कुठलाही तोडगा निघलेला



नाही.

शुक्रवारी दिल्लीतील कॉन्स्टिट्यूशन क्लबमध्ये कॉक्रोच जनता पार्टी आणि सरकार यांच्यात चर्चा झाली. या चर्चेला केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, जितेंद्र सिंह आणि सीजेपी प्रवक्ते सौरभ दास व आशुतोष रांका उपस्थित होते. या बैठकीनंतर सीजेपी प्रवक्ते आशुतोष यांनी सांगितले, 'आम्ही धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यावर तडजोड करणार नाही. सरकारने नुकसान भरपाई देण्याचे आणि आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले खटले मागे घेण्याचे मान्य केले आहे.' याबाबत केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा म्हणाले, 'दोन तासांच्या चर्चेदरम्यान, सीजेपीने सरकारसमोर तीन प्रमुख मागण्या आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी पाच सूचना मांडल्या आहेत. यावर विचार करण्यासाठी आम्ही उद्यापर्यंतची मुदत मागितली आहे.' सरकारने सीजेपीच्या प्रवक्त्यांना उद्या दुपारी ३:३० वाजता पुन्हा बैठकीसाठी बोलावले आहे. जर शिक्षणमंत्र्यांनी पुढील २-३ दिवसांत राजीनामा दिला नाही, तर सीजेपी २० जुलैच्या मोर्चासारखा दुसरा मोर्चा काढू शकतात असा कयास बांधला जात आहे.

## एनटीएमधील ४७ अधिकारी बडतर्फ; परीक्षा व्यवस्थेत होणार मोठे बदल

### नीट पेपरफुटीनंतर सरकारची मोठी कारवाई

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी प्रकरणानंतर राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या कामकाजावर सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना केंद्र सरकारने मोठी कारवाई केली आहे. एनटीएने शुक्रवारी तब्बल ४७ अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली असून, काही अधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर आणि फौजदारी कारवाईही केली जाणार आहे. ही कारवाई एनटीएच्या संपूर्ण पुनर्रचनेचा भाग असल्याचे सांगितले जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, केंद्र सरकार एनटीए च्या प्रशासकीय रचनेत आणि कार्यपद्धतीत व्यापक बदल करण्याच्या तयारीत आहे. पुढील एका महिन्यात एनटीएची पुनर्रचना केली जाण्याची शक्यता असून, त्याअंतर्गत परीक्षा घेण्याची पद्धत, प्रशासन आणि सुरक्षाव्यवस्थेत महत्त्वाचे बदल केले जाणार आहेत.

एनटीएच्या परीक्षा प्रक्रियेत वापरल्या जाणाऱ्या आउटसोर्सिंग मॉडेलचाही आढावा घेतला जात आहे. परीक्षांचे आयोजन आणि इतर तांत्रिक प्रक्रिया यामध्ये सध्या वापरल्या जाणाऱ्या पद्धतींचे पुनर्मूल्यांकन करण्यात येत असून, तज्ज्ञ समितीच्या शिफारसींनुसार नवीन प्रणाली लागू केली जाणार आहे.

सरकारचे उद्दिष्ट पेपरफुटीला पूर्णपणे आळा घालणारी 'लीक-प्रूफ' परीक्षा प्रणाली विकसित करण्याचे आहे. यामुळे राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

एनटीए दरवर्षी जेईई, नीट, सीयुईटी यांसह १५ ते २० राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षा आयोजित करते. अलीकडील पेपरफुटीच्या घटनांनंतर संस्थेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाल्यामुळे सुधारणा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. नीट पेपरफुटीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने शिक्षण मंत्रालयातही मोठा प्रशासकीय बदल केला आहे. सरकारने उच्च शिक्षण विभागाचे सचिव विनीत जोशी यांची बदली करून त्यांच्या जागी नरेश पाल गंगवार यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भातील अधिकृत अधिसूचना गुरुवारी उशिरा रात्री जारी करण्यात आली.

एनटीए ही केंद्र सरकारच्या अंतर्गत कार्यरत स्वयं-अर्थसहाय्यित संस्था आहे. सध्या संस्थेमध्ये, २२ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर, ३८ करारावर नियुक्त कर्मचारी, १३८ आउटसोर्स कर्मचारी, तसेच एक कर्मचारी मूळ विभागातून एनटीएमध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. याशिवाय, २९ ऑक्टोबर २०२४ रोजी सरकारने १६ नवीन पदांची निर्मिती केली होती. त्यामध्ये ८ संचालक आणि ८ संयुक्त संचालक स्तरावरील पदांचा समावेश आहे. नीट पेपरफुटीनंतर केंद्र सरकारने उचललेल्या या पावलाकडे राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता, जबाबदारी आणि विश्वासार्हता वाढविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल म्हणून पाहिले जात आहे. आगामी काळात एनटीएमध्ये आणखी मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## पेपर फोडल्यास आता १० वर्षांची शिक्षा, १० कोटींचा दंड बसणार; मंत्रिमंडळाकडून नव्या विधेयकाला मंजुरी

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी प्रकरणानंतर देशभरात विरोधाचा आगडोंब उसळला आहे. पेपरफुटीमुळे २० हून अधिक मुलांनी आत्महत्या केल्याच्या घटना विविध ठिकाणी घडल्या. या घटनांनंतर नव्याने स्थापन झालेल्या कॉक्रोच जनता पार्टीने जंतर-मंतरवर आंदोलनाची सुरुवात केली. पेपरफुटी थांबवणे ही शिक्षण मंत्र्यांची जबाबदारी होती. त्याबद्दल त्यांचा राजीनामा घेतला जावा, या मागणीसाठी तीव्र आंदोलन उभारले गेले. यानंतर केंद्र सरकारने आता मोठा निर्णय घेतला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पावसाळी अधिवेशनाची सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी पेपरफुटी प्रकरण गंभीर असल्याचे म्हटले होते. नीट प्रकरणात जे जे दोषी आहेत, त्यांना शिक्षा देण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना करणार असल्याची घोषणा त्यांनी केली होती. तसेच काल त्यांनी पेपरफुटी थांबविण्यासाठी नवीन कायदा करणार असल्याचे म्हटले होते.

याप्रमाणे आज मंत्रिमंडळ बैठकीत पेपरफुटी विरोधी विधेयकाचा मसुदा मांडण्यात आला. या मसुद्याला मंत्रिमंडळाने पाठिंबा दिला असून लवकरच हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडले जाणार आहे. पंतप्रधान मोदींनी घोषणा केल्यानंतर काही तासांतच ही मंजुरी मिळाली आहे.

संसद भवनातील संकुलात पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत पेपरफुटीच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना विद्यमान कायद्यांपेक्षा अधिक कठोर शिक्षा देणाऱ्या नव्या विधेयकाला मंजुरी देण्यात आली.

सार्वजनिक परीक्षा (गैरप्रकारांना प्रतिबंध) कायदा, २०२४ यामध्ये सरकारने सुधारणा करत सरकारने त्याला अधिक प्रभावी बनवले आहे. माध्यमात आलेल्या बातम्यांनुसार, पेपरफुटी प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी जलदगती न्यायालये स्थापन करण्याची तरतूद कायद्यात करण्यात आली आहे. पेपरफुटीच्या गुन्ह्यात सहभागी असलेल्यांना १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची आणि १० कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची शिक्षा होऊ शकते. सध्याच्या कायद्यानुसार, पेपरफुटी प्रकरणात दोषी आढळल्यास ३ ते ५ वर्षांचा कारावास आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. हे सुधारित विधेयक सोमवारी (२७ जुलै) लोकसभेत मांडले जाण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रातील डॉ. मनोज शिरूरे यांना जामीन देण्यास दिल्ली उच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी प्रकरणात आरोपी असलेल्या महाराष्ट्रातील डॉक्टर मनोज शिरूरे यांचा जामीन अर्ज दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळला. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, न्यायालयाने पेपरफुटी प्रकरणातील सर्व १३ आरोपींची न्यायालयीन कोठडी ६ ऑगस्टपर्यंत वाढवली आहे. पेपरफुटीमुळे देशाची बदनामी झाली, असे यावेळी दिल्ली उच्च न्यायालयाने नमूद केले.

दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले की, नीट यूजी पेपरफुटीमुळे भारतातील लाखो नीट परीक्षार्थींवर गंभीर परिणाम झाला, हे सर्वश्रुत आहे. या खटल्यात आतापर्यंत सादर झालेल्या पुराव्यानुसार प्राथमिकदृष्ट्या असे दिसून येते की, या मंडळींनी आपल्या लोभासाठी आणि अवैध संपत्ती गोळा करण्यासाठी संपूर्ण परीक्षा प्रक्रियाच उधळून लावली. एवढेच नाही तर त्यांनी आपल्या अवैध कृत्यांनी राष्ट्राचीही बदनामी केली, अशी टिप्पणी राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाचे विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी जामीन अर्ज फेटाळताना केली.

डॉ. मनोज शिरुरे यांनी ३ मे रोजी होणाऱ्या परीक्षे आधी, एप्रिल २०२६ मध्ये रसायनशास्त्राची प्रश्नपत्रिका उपलब्ध करून देण्यासाठी लातूरमधील आपल्या सिद्धिविनायक रुग्णालयाचा वापर करू दिला. सीबीआयने केलेल्या तपासानुसार, पेपरफुटी प्रकरणातील सहआरोपी शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांचा मुलगा आदित्य मोटेगावकर याला शिरुरे यांनी रसायनशास्त्राचे प्रश्न एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात पुरवले. यासाठी त्यांनी मोटेगावकर यांच्याकडून पाच लाख रुपयांची रक्कम घेतली. ही रक्कम शिरुरे यांच्या बहिणीच्या घरातून जप्त करण्यात आली.

विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी आपल्या आदेशात म्हटले की, आरोपींच्या निंदनीय आणि अवैध कृत्यांमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांचा परीक्षेच्या प्रक्रियेवरील विश्वास डळमळीत झाला. हे विद्यार्थी स्वतःच्या कौशल्य आणि क्षमतेच्या जोरावर इतर विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत असतात. यासाठी ते प्रामाणिकपणे (पान ४ वर)

## दिल्लीत पोलिस आयुक्तांना कोणालाही ताब्यात घेत तीन महिने नजरकैदेत ठेवण्याचा अधिकार

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- दिल्लीच्या जंतरमंतवर कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. राजधानी दिल्लीत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय आणि दिल्लीच्या उपराज्यपालांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार दिल्लीचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अनुराग कुमार यांना कोणत्याही व्यक्तीला थेट ताब्यात घेण्याचे विशेष अधिकार दिले आहेत. बुधवारी दिल्लीच्या अधिकृत राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. या अधिसूचनेवर १५ जुलैची तारीख देण्यात आली असून, हे विशेष अधिकार १९ जुलै २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहतील. दिल्ली सरकारने दिल्लीच्या पोलीस आयुक्तांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्या अंतर्गत विशेषाधिकार वापरण्यास तीन महिन्यांच्या कालावधीसाठी प्राधिकृत केले आहे. हा कालावधी १९ जुलैपासून सुरू झाला आहे. पोलिसांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे की, हा आदेश नियमित प्रक्रिया असून याचा विद्यार्थी आणि 'कॉकरोच जनता पार्टी' या कार्यकर्त्यांच्या व्यासपीठाद्वारे सुरू असलेल्या निदर्शने/आंदोलनांशी काहीही संबंध नाही. राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत काही विशिष्ट प्रकरणांमध्ये व्यक्तींना प्रतिबंधात्मक नजरकैदेत ठेवण्याची तरतूद आहे. यामध्ये 'राज्य सुरक्षेला बाधा आणणारे कृत्य, सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था बिघडवणे, किंवा समाजासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात अडथळा आणणारे कृत्य' यांचा समावेश होतो. हा कायदा कायद्यात दिलेल्या सुरक्षेच्या नियमांच्या अधीन राहून ठराविक कालावधीसाठी तात्काळ गुन्हेगारी खटल्याशिवाय नजरकैदेत ठेवण्याची परवानगी देतो.

## पंतप्रधानांनी सभागृहात येऊन संपूर्ण प्रकरणावर निवेदन द्यावे-खरगे

### बोलण्यासाठी उभे राहिल्यावर राहुल गांधींना थांबवले

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशीही पेपरफुटीचा मुद्दा दोन्ही सभागृहांवर प्रभावी ठरला. लोकसभेत विरोधी पक्षनेते राहुल गांधी आपले म्हणणे मांडण्यासाठी उभे राहिले, परंतु पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी त्यांना तात्काळ बोलण्याची परवानगी दिली नाही.

त्यांनी सांगितले की, आधी सभागृहाच्या पटलावर आवश्यक कागदपत्रे ठेवली जातील, त्यानंतर त्यांना संधी दिली जाईल. मात्र, सततच्या गोंधळामुळे ती संधी मिळू शकली नाही आणि लोकसभेचे कामकाज २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.

सकाळी ११ वाजता लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी खासदारांनी पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील कथित लाठीचार्जचा मुद्दा उपस्थित करत घोषणाबाजी सुरू केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना आपापल्या जागांवर परत येऊन सभागृहाचे कामकाज चालू देण्याचे आवाहन केले, परंतु गोंधळ थांबला नाही. त्यानंतर कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले. दुपारी १२ वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरू झाली. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सभागृहाला सांगितले की, सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी आपले आमरण उपोषण संपवले आहे. त्यांनी असेही सांगितले की, सरकार पेपरफुटीच्या मुद्द्यावर चर्चा करण्यास तयार आहे आणि या संदर्भात दुपारी १ वाजता होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कठोर कायद्यावरही विचार केला जाईल. यावर विरोधकांचा गदारोळ पुन्हा वाढला.

राहुल गांधी आपले म्हणणे मांडण्यासाठी उभे राहिले, परंतु पीठासीन अधिकारी जगदंबिका पाल यांनी सांगितले की, सभागृहाच्या कार्यसूचीनुसार आधी पटलावर कागदपत्रे ठेवली जातील, त्यानंतर त्यांना बोलण्याची संधी दिली जाईल. कागदपत्रे ठेवण्याची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच घोषणाबाजी वाढली. कामकाज सुरळीत होऊ शकले नाही आणि राहुल गांधी आपले म्हणणे मांडू शकले नाहीत. अखेर लोकसभेची बैठक २७ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित (पान ४ वर)

## ठाकरे बंधूंच्या रविवारच्या मोर्चात काँग्रेसही सहभागी होणार

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- 'नीट' पेपरफुटी प्रकरण आणि दिल्लीतील जंतरमंतरवर विद्यार्थ्यांवर झालेल्या दडपशाहीच्या निषेधार्थ ठाकरे बंधूंनी (उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे) एकत्र येत २६ जुलै रोजी मुंबईत महामोर्चाची घोषणा केली आहे. या मोर्चाला आता मोठे स्वरूप प्राप्त होत असून, यामध्ये काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीचे इतर घटक पक्षही सहभागी होणार असल्याची अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आता मुंबईत मोठे बळ मिळणार आहे. काल (२३ जुलै) राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन या मोर्चाची घोषणा केली होती, आणि सर्व राजकीय पक्ष व पालकांना यात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत, काँग्रेस नेते हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की, 'जर विद्यार्थ्यांच्या मुद्द्यावर सर्व पक्ष एकत्र येत असतील, तर आम्हाला त्यात सहभागी होण्यास कोणतीही हरकत नाही.'

## देशातील अनेक राज्यात विद्यार्थ्यांचा नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ रस्त्यावर आक्रोशाचा वणवा, वकील सुद्धा आंदोलनात

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी देशभरात आंदोलने होत आहेत. महाराष्ट्र, बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान, हरियाणासह देशभरात संतापाचा उद्रेक झाला आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला प्रतिसाद म्हणून पाटणामध्ये मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. बक्सरमधील विद्यार्थी पोस्टर आणि बॅनर घेऊन रस्त्यावर उतरले. राजस्थानच्या जयपूरमध्ये वकीलांनी धरणे आंदोलन केले. राजस्थान विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे उपोषण सुरूच आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये वकिलांनी मोर्चा काढला. हरियाणाच्या चार जिल्ह्यांमध्ये वकील धरणे आंदोलनात सामील झाले.

नीट पेपरफुटी आणि धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी बिहारमध्ये विद्यार्थ्यांची आंदोलने सुरूच होती. बक्सरमधील विद्यार्थी पोस्टर आणि बॅनर घेऊन रस्त्यावर उतरले. वैशालीमध्ये मोठ्या संख्येने आंदोलक घोषणाबाजी करत रस्त्यावर उतरले. यादरम्यान पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचे पुतळे जाळण्यात आले. समस्तीपूर-मधुबनी येथेही आंदोलने होत आहेत. पाटण्यातील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आमदार आपल्या वाहनांवरील झेंडे काढून कामकाजासाठी आले. विधानसभा आणि रेल्वे स्थानकावर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. रस्त्यावर दिसणाऱ्या विद्यार्थ्यांना थांबवून त्यांची चौकशी केली जात आहे. शहरात ध्वजसंचलन आयोजित करण्यात आले आहे.

दिल्लीतील जंतर मंतर येथे नीट पेपरफुटीविरोधात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील पोलीस कारवाईच्या निषेधार्थ राजस्थानातही निदर्शने झाली. जोधपूरमधील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन सुरू असताना, युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी बॅरिकेड्सवर चढण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांना मागे ढकलले. कार्यकर्ते आणि पोलिसांमध्ये झटापट झाली. (पान ४ वर)

## हिमाचलमध्ये धावत्या कारवर दरड कोसळून १३ ठार

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- शुक्रवारी हिमाचल प्रदेशातील लाहौल-स्पितीमध्ये उदयपूर-किलाड रस्त्यावर काडू नाला जवळ भूस्खलन झाले. त्याच्या कचाट्यात एक टाटा सुमो टॅक्सी सापडली. वाहनात पंधरा जण होते, त्यापैकी १३ जणांचा मृत्यू झाला.

दरम्यान, गुजरातमध्ये मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पूर आला आहे. वलसाडच्या उमरगाम तालुक्यात १६ तासांत ४३ इंच पावसाने सखल भाग पाण्याखाली गेला आहे.

नवसारीमध्ये पुराच्या पाण्यात अडकलेल्या लोकांना हेलिकॉप्टरने बाहेर काढण्यात आले. अहमदाबाद आणि सुरतमध्ये पूर आला. वाव-थ्राड जिल्ह्यातील बाजारपेठा पाण्याखाली गेल्या. गेल्या १० दिवसांपासून उत्तर प्रदेशात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गंगा आणि यमुना नद्यांसह १० नद्यांना पूर आला आहे. सीतापूरमध्ये रस्त्यावर पाणी साचल्याने गावकऱ्यांना बोटीने प्रवास करावा लागत आहे. दरम्यान, बांसवाडा आणि डुंगरपूरसह राजस्थानच्या ११ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## जंतरमंतर आंदोलनापासून विद्यार्थ्यांना लांब राहण्याचा दिल्ली विद्यापीठाचा इशारा

### लिहून ठेवा, वेळ येईल तेव्हा तुम्हाला सोडणार नाही-राहुल गांधी

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- गेल्या महिनाभरापासून दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन करणाऱ्या दिल्लीतील तरुण विद्यार्थ्यांना दिल्ली विद्यापीठाने एका प्रकारे धमकी दिली आहे. या धमकीनंतर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सुद्धा 'तुमची हिंमतच कशी झाली' असे म्हणत, 'भविष्यात वेळ येईल तेव्हा तुम्हाला सोडणार नाही' असा गर्भित इशारा दिला आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा दिल्ली विद्यापीठाच्या सूचनेवरून रणकंदन माजण्याची चिन्हे आहेत.

दिल्ली विद्यापीठाने केलेल्या ट्विटमध्ये म्हटलं आहे की, 'आपली सुरक्षितता आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कृपया नोंद घ्या की नवी दिल्ली येथील जंतर मंतर येथे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नियम लागू आहेत. त्यामुळे तेथे कोणतेही बेकायदेशीर जमाव किंवा आंदोलने केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो, तसेच त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि भविष्यातील करिअरच्या संधींवर गंभीर वाईट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे, सर्व विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी जंतर मंतरपासून दूर राहावे आणि स्वतःची सुरक्षितता तसेच कायद्याचे पालन करण्याला प्राधान्य द्यावे. याशिवाय, सध्या परिस्थिती चिथावण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या बातम्या/अफवा पसरवल्या जात आहेत, त्यामुळे सर्वांनी खबरदारी बाळगावी.'

दरम्यान, (पान ४ वर)

## बांगलादेशात राजकीय भूकंप, राष्ट्रपती शहाबुद्दीन यांचा राजीनामा

ढाका दि.२४ (वृत्तसंस्था)- बांगलादेशात २०२४ पासून मोठ्या राजकीय घडामोडी सुरू आहेत. २०२४ मध्ये बांगलादेशमध्ये झालेल्या निदर्शनांमुळे शेख हसीना यांना पंतप्रधान पदावरून पायउतार व्हावं लागलं होतं. त्यानंतर शेख हसीना यांनी बांगलादेशातून पलायन करत भारतात आश्रय घेतला होता. काही दिवसांपूर्वी शेख हसीना यांनी घोषणा करत आपण डिसेंबरमध्ये मायदेशी परतणार असल्याचं सांगितलं. शेख हसीनांच्या मायदेशी परतण्याच्या घोषणेनंतर बांगलादेशात मोठ्या राजकीय घडामोडी सुरू झाल्या आहेत.

बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तडकाफडकी राष्ट्रपती पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली आहे. मोहम्मद शहाबुद्दीन यांचा कार्यकाळ आणखी दोन वर्षे बाकी होता. मात्र, त्याआधीच शहाबुद्दीन यांच्यावर राजीनामा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात दबाव वाढला होता. त्यानंतर अखेर आज (२४ जुलै) मोहम्मद शहाबुद्दीन यांनी पदाचा राजीनामा दिला. दरम्यान, बांगलादेशच्या संविधानानुसार, (पान ४ वर)

## सोनम वांगचुक यांनी उपोषण का संपवलं? पत्नी गीतांजली आंग्मो यांनी दिली माहिती

नवी दिल्ली दि.२४ (वृत्तसंस्था)- नीट पेपरफुटी प्रकरणात विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि या पेपरफुटीची जबाबदारी सरकारने निश्चित करावी, या मागणीसाठी पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी शुक्रवारी मध्यरात्री आपले उपोषण सोडले. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, डॉ. जितेंद्र सिंह यांनी यासाठी मध्यस्थी केली होती. उपोषण सोडताना केंद्र सरकारने त्यांना काही लेखी आश्वासने दिली आहेत. याची माहिती आता त्यांच्या पत्नी डॉ. गीतांजली आंग्मो यांनी दिली.

केंद्र सरकारने आम्हाला आधी तोंडी आश्वासने दिली होती. २० जुलै रोजी संसदेवरील मोर्चात सहभागी झालेल्या काही आंदोलकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर आताही अनेक आंदोलकांवर गुन्हे दाखल केले जाऊ नयेत, अशी आमची मागणी होती. तोंडी आश्वासन दिल्यामुळे काल सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण सुरूच ठेवले, अशी माहिती डॉ. गीतांजली यांनी दिली.

काल रात्री सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडले, त्याबाबतचा घटनाक्रम सांगताना त्या म्हणाल्या, केंद्र सरकारने आमच्या मागण्या लेखी स्वरुपात मान्य केल्या आहेत. यानुसार जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान ज्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत, ते मागे घेतले जावेत. नीट पेपरफुटीनंतर ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली, त्यांच्या कुटुंबीयांना नुकसान भरपाई देण्यात यावी.

तसेच तिसऱ्या मागणीबाबत बोलताना डॉ. गीतांजली म्हणाल्या की, शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल केले जावेत. शिक्षण व्यवस्था सुधारणा आणि परीक्षा पद्धतीत सुधारणा व्हाव्यात, अशी मागणी आम्ही केली होती. त्याबद्दल संसदेत चर्चा केली जाणार आहे. या तीनही मागण्या आम्हाला लेखी स्वरुपात देण्यात आल्या आहेत.

# भेटीलागी जीवा...

ज्येष्ठ महिना लागायच्या अगोदरपासूनच वारकऱ्यांना वारीचे वेध लागतात. केवळ महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक, गोव्याकडूनही दिंड्या येतात. जगाच्या पाठीवर असा हा अभूतपूर्व व दीर्घ आनंद-सोहळा अन्यत्र कुठेच पाहावयास मिळत नाही. एकदा तरी हा अनुभव सुख-सोहळा 'याचि देही याचि डोळा' भरून पाहावा असे वाटते. दिंडी सोहळा म्हणजे स्त्री- पुरूष- आबालवृद्ध वारकऱ्यांचे आध्यात्मिक संमेलन होय. निरनिराळ्या गावातून 'ईश्वरनिष्ठांची ही मांदियाळी' जागोजागी मुक्काम करत पंढरपुरास पोहोचते. कुणाचेही 'आवतण' आले नसताना उत्स्फुर्त रितीने प्रत्येक वारकरी त्याच्या त्याच्या दिंडीत सहभागी होतो, ते एका अतूट अशा विठ्ठलभक्तीच्या धाग्याने.

'या रे या रे सान थोर' अशी हाक तुकाराम महाराजांनी घातल्यावर जाती-पंथ, लहान-थोर, उच्च-नीच हे भेदाभेद येथे गळून पडतात. उरतो तो एकच अव्दैत भाव. त्यामुळेच अवघा जनसागर या टाळ-मृदूंगांच्या भक्तीच्या प्रवाहात सामील होतो. टाळ-मृदुंग गर्जती, माझ्या विठ्ठलाची प्रीती' याचे प्रत्यंतर इथे सापडते. खरोखरच अचेतनाला चैतन्याची पालवी फुटलेली पाहावयास मिळते. प्रत्येकाच्या हातात टाळ, मुखी नाम घोष, खांद्यावर भागवत धर्माची पताका, तर काही स्त्रियांच्या डोईवर तुळस-वृंदावन घेतलेले दिसते. जनी म्हणते तसे 'अवघा रंग, एक झाला! रंगी रंगला श्रीरंग' अशी बेभान अवस्था त्या वारकऱ्यांची होते. हा सोनियाचा दिनू पाहावयास आतुर झालेले वारकरी माऊलीच्या समवेत, संतांच्या मांदियाळीबरोबर पावले टाकताना 'माऊली माऊली, ज्ञानोबा माऊली तुकाराम' या मंत्राचा अखंड जप करीत मार्गक्रमण करतात. माऊलींच्या संगतीत असल्याने त्यांना ऊन -वारा, पाऊस-पाणी याची तमा नसते. 'माझ्या जीवीची आवडी' कोणती तर 'पंढरपुरा नेईन गुढी' असे ज्ञानोबा म्हणतात ते उगीच नाही. सगळीकडे अवतीभवती सगुणाचा साक्षात्कार दिसतो, सदाचाराचा, सत्संगाचा आचार आढळतो आणि मग अवघाची संसार सुखाचा व्हावयास वेळ नाही लागत. त्यासाठी या भक्तिमार्गावरून विठ्ठलाच्या पंढरपुरी जावे, नाम घोषात दुमदुमलेली पंढरी डोळे भरून पाहावी. 'माझे माहेर पंढरी' असे म्हणणाऱ्या एकनाथांनीसुद्धा संसार सोडला नाही हे वास्तव जीवन-सासर सोडून माहेरी जाण्याची त्याला भेटण्याची ओढ अंतरी लागते. 'भेटी लागी जीवा लागलीसे आंस' अशी अवस्था होते. तुम्ही-आम्ही परीट घडीचे प्रवासी आम्हाला हे अशक्य वाटते. एवढा अठरा-वीस दिवसांचा जवळजवळ अडीचशे कि.मी.चा प्रवास शक्य नाही असेच वाटते. परंतु खरं सांगायचं तर त्याची कृपा असल्यावर दृढ निष्ठा असल्यावर 'पंगुम् लंघयतेत् गिरीम्' हेच खरे वाटते. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती! चालविसे हाती धरूनिया' अशीच अवस्था होते.

वारीचे वैशिष्ट्य म्हणजे वारीची प्रचंड शिस्त, वस्तुत: येथे कुणी पगारदार नोकर वगैरे नसतात. परंतु याच्या मुळाकडे लक्ष घातल्यावर आढळते ते असे की, पूर्वीपासून हा पालखी सोहळा होताच. पायी वारी होती. कित्येक घराण्यात आजही ती चालू आहे. परंतु आजचे हे वैभवाचे, दिमाखाचे स्वरूप कै. हैबतबाबा आरफळकर या सैनिकी बाण्याच्या शिलेदाराकडून प्राप्त झाले आहे. प्रत्येक दिंडीची योजनापूर्वक आखणी, कामाचा व्याप बघता सर्वांनी शिस्तीने, एकीने वागल्यास दुजाभाव उरतोच कुठे? आजच्या एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकाची पायवाट करताना भले आपण निरनिराळ्या ग्रहांवर पाऊल ठेवले असेल. एकीकडे यांत्रिकतेमुळे जग जवळ आले आहे; पण माणूस-'माणूसपण' हरवून बसला आहे. त्याचे सुख-दु:ख ऐकायला, ते दूर करावयास कुणालाच सवड नाही. आज आपण मी कोण, कशासाठी आलो याचा विचारच करत नाही. सगळीकडेच 'आत्मकेंद्रीवृत्ती' आढळून येते. पैसा-त्याच्याच मागे सारीच धडपड, बुद्धीवादी जगता प्रमाणे भावजगतही आहे. भावेविण भक्ती, भक्तीविणा मुक्ती, बळेविण शक्ती बोलू नये असे माऊलींनी म्हटले आहेच. विश्वात्मक देवाला पाहण्यासाठी माऊलींनी जो भक्तीचा साधासुधा सोपान दाखवला, अनुभवला त्याच मार्गावरून आपणही गेल्याने वाईट तर नक्कीचं होणार नाही. झालं तर चांगलंच होईल. माऊलीचे बोट मात्र सोडता कामा नये. विठोबाची आण घेऊन तुकाराम महाराज म्हणतात, 'तुको म्हणे सोपे आहे सर्वांहूनी! शहाणा जोधनी घेतो येथे'. 'पंढरीच्या या भुताने झपाटले' असे झाल्यावर मीपण उरले कुठे?

## ज्ञानधारा विद्यालयातील विद्यार्थिनींना रोटरी क्लबतर्फे सायकलींचे वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- धारेश्वर शिक्षण संस्था संचलित ज्ञानधारा प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, देवळाई परिसर, बीड बायपास रोड येथे विद्यार्थिनींसाठी सामाजिक उपक्रमांतर्गत सायकल वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. छत्रपती संभाजीनगर येथील रोटरी क्लबच्या वतीने विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी उपसंचालक, क्रीडा विभाग श्री. चंद्रकांत कांबळे सर होते. यावेळी छत्रपती संभाजीनगर रोटरी क्लबचे अध्यक्ष किरण जोशी, सचिव किरणकुमार धोत्रे, रोटरी क्लबचे चंद्रकांत देशपांडे तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्री. महेश पाटील सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थिनींना शिक्षणासाठी शाळेत ये-जा करताना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन रोटरी क्लबच्या माध्यमातून करण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. सायकली मिळाल्याने विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. जाधव व्ही. बी. सर यांनी केले. यावेळी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालय प्रशासन व रोटरी क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# भगवान विठ्ठल ब्रम्हांडाचे पालनहार.



**पांडुरंग** हे विष्णुचा अवतार आहे. त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत. परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे.आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या ह्रुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात.याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक, वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन.महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते.कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे. त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात. एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे.

विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात.

पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळिवण्याचा निश्चय केला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले.या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन एकादशी देवता उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८४ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतः ला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात.त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळिवण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे. आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले.याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे. कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल.त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर)

## पंढरी

माय बापाच्या सेवे परी
नाही दुजी पंढरी
नाही दुजा श्रीहरी
एकादशीला पंढरपुरी
विठ्ठल दर्शनाचे महत्त्व भारी

आषाढी कार्तिकीच्या वारीत
लाखो भक्तांच्या भक्तीत
समभाव मनात
दिंड्या चालतात पुढील मुक्कामात

पंढरीचा विठ्ठल भारी दैवत
महाराष्ट्राचे भूषण पंढरीच्या वैभवात
पंढरीचा विठ्ठल श्रीहरीचे रूप
'उभा विटेवरी कर कटेवरी' शोभते खूप

विठू नामात शक्ती अद्भुत
समभावाच्या वारी अनुभवात
भक्तीच्या अथांग सागरात
जीवन अनुभूतीत

तळपायात अंगार
दर्शनासाठी अधीर
गाठतात पंढरपूर
करत ज्ञानबा तुकारामाचा गजर

दिंड्या होती गोळा
चंद्रभागे तिरी वारकर्यांचा मेळा
स्नान संध्या आटपून कपाळा
कुंकू बुक्का चंदन टिळा

ज्ञानियांचा राजा संत ज्ञानेश्वर
ज्ञानेश्वरी ग्रंथ रचिता संत
थोर भगवद्गीतेचे प्राकृतात रूपांतर
ज्ञानमार्ग झाला सुकर

संतश्रेष्ठ तुकाराम महाराज
जगद्गुरु परम विठ्ठल भक्त
तुका म्हणे
भक्ती मार्ग इशभजन कीर्तनात
'ईशसंग हे जीवनांग'

तुका झळके कळसात
वारकरी संप्रदायात
राहून प्रपंचात
नाव मोठे संत साहित्यात
तुकारामाच्या गाथा अभंग कविता
साहित्य शिक्षणाच्या अभ्यासात
पंढरीनाथाच्या भक्ती वैभवाचा सोहळा
जगी नाही दुजा असा वारकरी भक्तांचा मेळा.

**– डॉ. अलका मधुकर काथार**

# आज आषाढी एकादशी

महाराष्ट्र ही संत-महंतांची भूमी आहे. या राज्यात थोर संतांनी आपल्या अमृत वचनातून जी अमृत पेरणी केलेली आहे. ती आजही टिकून आहे.देशात व राज्यात विविध सण व उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात.या सण व उत्सवातून महाराष्ट्र राज्यात अध्यात्मिक परंपरा टिकून आहे. आषाढ महिन्यातील वारकरी संप्रदायाचा आनंदोत्सव म्हणजे पंढरपूरची आषाढी एकादशी होय. पंढरपूरचे दैवत विठ्ठल म्हणजे

साक्षात भगवान विष्णुचे अवतार होय. भगवान विष्णु या भूतलावरील समस्त सजीवांचे पालनकर्ता होतं. या विठ्ठलाच्या दर्शनासाठी केवळ राज्यातूनचं नव्हे तर संपूर्ण देशातून थोर संत महातम्यांच्या पायी पालख्या आषाढीच्या एक महिना आधी पंढरपूरला यावयास सुरुवात होते. या पायी पालखी फेरीत सर्व जाती,धर्म,पंथ,संप्रदायाचे भक्त-भाविक ,वारकरी एक दिलाने संघटित होऊन पंढरपुरी जाऊन विठ्ठलाच्या चरणी माथा टेकून सर्व जनता-जनार्दन सुखी, समृद्ध, आनंदी, निरोगी ठेवण्यासाठी प्रार्थना करतात.बळीराजासाठी भरपूर पाऊस व शेती उत्पादन साठी प्रार्थना करतात.

पंढरपूर नगरी विठ्ठल नामाने, भंजन, टाळ ने गुगुण जाते.महिला-पुरुष चंद्रभागेच्या तीरावर वालुकामय जागी विठ्ठल नामात तल्लीन होतात. पांडुरंगाला अनाथाचा नाथ संबोधतात,या नाथाच्या दर्शनासाठी व्याकुळ झालेले भक्त,वारकरी पांडुरंगाच्या चरणी लीन होऊन व्यथामुक्त होण्यासाठी प्रार्थना करतात.आषाढी एकादशी म्हणजे स्नेह, आपुलकी, सदभाव, सदविचार, सदसंगत व सदगुणांचा महोत्सव होय.ज्ञानदेवापासून

वारकरी संप्रदायाचा जन्म झाला व संत तुकाराम महाराजांनी कळस रचला असे मानले जाते.या संप्रदायाने सर्वांना समान मानलेले आहे.शुद्ध मनाने,निमर्ळ मनाने भगवंताचे नाम स्मरण करून

काया-वाचा-व मन भगवंताला अर्पण करणे,हेच भागवत धर्माचे सार आहे. अशा या पावन व पवित्र आषाढी एकादशी दिनी साधी, सरळ,व शुद्ध मनांची माणसे,भक्त,भाविक एकत्र येऊन पंढरीच्या विठ्ठलाशी एकरूप होतात,व विठ्ठलाला अनेक गोष्टीचे साकडे घालतात.गावो-गावीचा हा सर्वांग सुंदर मेळा पाहून विठ्ठल ही निश्चितच प्रभावित होत असतील यात शंका नाही.व भक्तांची मनोभावना ओळखून ती पूर्ण करतो असे मानतात. विठ्ठला या वर्षी भरपूर पाऊस दे!बळीराजा सुखाऊ दे! इर्ळा-पिळा टळू दे! व महाराष्ट्र व देश सुखाऊ दे!हीच तुमच्या चरणी प्रार्थना.

**– धोंडीरामसिंह राजपूत**

### आषाढी एकादशी

आषाढी एकादशीचा किती वर्णावा सोहळा
विठुरायांच्या पंढरीचा भक्तांना असे लळा
पायी दिंडीने जातो महाराष्ट्र वारकरी
म्हणतो आम्ही सर्व पंढरीचे वारकरी
आषाढी एकादशीला असे विठ्ठल माऊलीचे दर्शन
किती-किती करावे पंढरी प्रसंगांचे वर्णन
विठुरायाच्या दर्शनाने वारकरी सुखावतो
महाराष्ट्र कल्याणार्थ विठुला प्रार्थना करतो
आषाढी एकादशीची महान असे थोरवी
साऱ्यांच्या तोंडी विठू नामाची गोडवी

**–धोंडीरामसिंह राजपूत**

# आषाढी एकादशी-इतिहास आणि महत्त्व

आषाढी एकादशी म्हटले की, डोळ्यांसमोर येते, ती पंढरपूरची वारी ! वर्षभरातील २४ एकादशांमध्ये या एकादशीचे एक विशेष महत्त्व आहे. या दिवशीच्या व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. आषाढी एकादशी या व्रतामागील इतिहास आणि तिचे महत्त्व तसेच पंढरपूरची वारी याविषयीची माहिती सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या लेखातून जाणून घेऊया.

१. प्रकार – आषाढ मासाच्या शुक्ल पक्षातील एकादशीला 'देवशयनी (देवांच्या निद्रेची)' आणि वद्य पक्षातील एकादशीला 'कामिका एकादशी', असे म्हणतात.


२. इतिहास – 'पूर्वी देव आणि दानव यांच्यात युद्ध पेटले. कुंभ दैत्याचा पुत्र मृदुमान्य याने तप करून शंकराकडून अमरपद मिळवले. त्यामुळे तो ब्रह्मदेव, विष्णु, शिव अशा सर्व देवांना अजिंक्य झाला. त्याच्या भयाने देव त्रिकुट पर्वतावर धात्री (आवळी) वृक्षातळी एका गुहेत दडून बसले. त्यांना त्या आषाढी एकादशीला उपवास करावा लागला. पर्जन्याच्या धारेत स्नान घडले. अकस्मात त्यांच्या सर्वांच्या श्वासापासून एक शक्ती उत्पन्न झाली. त्या शक्तीने गुहेच्या दाराशी टपून बसलेल्या मृदुमान्य दैत्याला ठार मारले. ही जी शक्तीदेवी, तीच एकादशी देवता आहे.

३. महत्त्व – आषाढी एकादशी व्रतात सर्व देवतांचे तेज एकवटलेले असते. कामिका एकादशी ही मनोकामना पूर्ण करणारी एकादशी आहे. ही पुत्रदायी एकादशी आहे.

४. व्रत करण्याची पद्धत – आदल्या दिवशी दशमीला एकभुक्त रहायचे. एकादशीला प्रातःस्नान करायचे. तुलसी वाहून विष्णुपूजन करायचे. हा संपूर्ण दिवस उपवास करायचा, रात्री हरिभजन करत जागरण करायचे. आषाढ शुद्ध द्वादशीला वामनाची पूजा करायची आणि पारणे सोडायचे. या दोन्ही दिवशी 'श्रीधर' या नावाने श्रीविष्णूची पूजा करून अहोरात्र तुपाचा दिवा लावण्याचा विधी करतात.

५. एकादशीचे व्रत कसे करावे ? 'एकावर एक ११ म्हणजे एकादशी. याचा अर्थ एकत्व सोडू नये. या दिवशी लंघन करणे, उपवास करणे, याचा उद्देश आहे, लक्ष तिकडे न जाता भगवंताकडे रहावे. मात्र आता हा अर्थ गौण झाला आहे आणि उपवास प्रधान झाला आहे ! या दिवशीचे तत्त्व साधना करण्याला अनुकूल असते. एकादशी प्रतिदिनच केली पाहिजे; मात्र एक दिवस योग्य तर्हेने केल्यास त्याचा प्रभाव १५ दिवस टिकतो; म्हणून एका मासात २ एकादशी असतात.' – परात्पर गुरु परशराम पांडे महाराज

६. पंढरपूरची वारी – अदृश्य भगवंताच्या अस्तित्वाचा एक भक्कम पुरावा म्हणजे पंढरपूर ! वैकुंठभुवनाच्या आधीपासून पंढरपूर अस्तित्वात आले. त्यामुळे पृथ्वीवरील सर्वांत पुरातन तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूरचा उल्लेख केला जातो. त्यासंदर्भात एक ओवी आहे, आधी रचिली पंढरी, नंतर वैकुंठ नगरी । संत नामदेव महाराजही आपल्या अभंगात सांगतात, जेव्हा नव्हते चराचर, तेव्हा होते पंढरपूर ! पृथ्वीवरील केवळ दोनच तीर्थक्षेत्रे नाश न पावणारी आहेत. एक म्हणजे काशी आणि दुसरे म्हणजे पंढरपूर, कारण या क्षेत्रांचा अविनाशी तत्त्व असा महिमा भगवान शंकर आणि विष्णु यांनी आपल्या अखंड वास्तव्याने कथन केला आहे. काशीमध्ये शंकराचे आणि पंढरपूरमध्ये विष्णूचे स्थूल रूपात अस्तित्व आहे; म्हणूनच प्रत्येक हिंदू इहलोकाची यात्रा संपवण्यापूर्वी एकदा तरी काशीस अथवा पंढरपूरला जावे, अशी इच्छा बाळगून असतो. सप्तर्पुयांपेक्षाही थोरवी प्राप्त झालेले हे पंढरपूर आहे.




**'बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल ।**
**करावा विठ्ठल जीवभाव ?'**

या अभंगाची प्रचीती आज प्रत्येक वारकरी आणि विठ्ठल भक्त घेत नित्यनेमाने घेत असतो. नव्हे, तर पंढरीचा विठ्ठल हा वारकर्यांचा श ?वासच आहे. त्याच्या नामाविना त्यांचे कोणतेच कर्म होत नसते. अशा भगवद्भक्त असलेल्या वारकर्यांचा महासंगम पंढरपूर यात्रेच्या म्हणजेच वारीच्या निमित्ताने होत असतो.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाच्या वर्षी जरी काही वारकर्यांना पंढरपूरला जाता आले नाही, तरी प्रत्येक वारकरी मनातून विठ्ठलाला आळवत समष्टी कल्याणासाठी कोरोनाचे संकट दूर करण्यासाठी प्रार्थना करत असेल, हेही निश्चित !

प्रत्येकाचे कल्याण चिंतणे, कार्यात भगवंताला पहाणे, धर्मपूर्वक गृहस्थाश्रमाचे पालन करणे आणि भागवतधर्माचा मार्ग सुकर करणे हेच वारकर्यांचे भक्तीमय जीवन असते ! आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठलाचा नामजप आणि उपासना करून एकादशी व्रताचा आध्यात्मिक लाभ घेऊया.

– संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'

– संकलन– श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था

# विकसित भारत २०४७ च्या दिशेने छत्रपती संभाजीनगरची भक्कम वाटचाल

## 'सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट'च्या माध्यमातून शहर विकासाला मिळणार नवी दिशा; 'मित्र' संस्थेसोबत होणार सामंजस्य करार

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- विकसित भारत @२०४७ आणि विकसित महाराष्ट्र या संकल्पनेशी सुसंगत राहून छत्रपती संभाजीनगरचा सर्वांगीण, शाश्वत आणि दूरदृष्टीपूर्ण विकास साधण्यासाठी महानगरपालिकेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. त्याअंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट तर्फे आज महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली शहराच्या दीर्घकालीन विकास आराखड्याचे सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

बैठकीस स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, विरोधी पक्षनेते अब्दुल समीर साजिद, आयुक्त अमोल येडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, उपायुक्त नंदकिशोर भोंबे, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन चे वरिष्ठ सल्लागार निखिल नानगुडे, क्षेत्र तज्ज्ञ आनंद जोशी तसेच महानगरपालिकेचे विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.

**शहराच्या सर्वांगीण विकासाचा आराखडा सादर**

सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटने शहराच्या भविष्यातील विकासासाठी विविध महत्त्वाच्या क्षेत्रांवर सादरीकरण केले. यामध्ये औद्योगिक विकास, पर्यटन व वारसा संवर्धन, शहराला शिक्षणाचे राष्ट्रीय केंद्र बनविणे, तंत्रज्ञानाभिमुख शहर विकास, ऊर्जा वितरण व्यवस्था बळकट करणे, तलाव व जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन, वाहतूक आणि सार्वजनिक परिवहन व्यवस्था, महानगरपालिकेची आर्थिक क्षमता वाढविणे, रस्त्यांचे आधुनिकीकरण, तसेच रस्ते व पादचारी सुरक्षा या विषयांचा समावेश होता.

**'मित्र' संस्थेच्या सहकार्याने शहर विकासाला गती**

महानगरपालिकेने चालू अर्थसंकल्पात सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटसाठी निधीची तरतूद केली असून, या युनिटमार्फत दीर्घकालीन विकास आराखडा, प्रकल्पांची निवड व प्राधान्यक्रम, धोरणात्मक नियोजन, डेटा-आधारित देखरेख, परिणाममापन आणि कार्यक्षम अंमलबजावणीवर भर दिला जाणार आहे.

यासाठी महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (श्घ्ढ्रें) या संस्थेसोबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या कराराअंतर्गत सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटची संस्थात्मक उभारणी, शहर विकास आराखडा, प्रकल्प व्यवस्थापन, तांत्रिक मार्गदर्शन, डेटा-आधारित मॉनिटरिंग प्रणाली आणि आवश्यक तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी 'मित्र' संस्थेचे सहकार्य मिळणार आहे.

मान्यवरांचे मनोगत

महापौर समीर राजूरकर म्हणाले 'छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्याचे प्रवेशद्वार आणि विकासाचे प्रमुख केंद्र आहे. जागतिक वारसा, औद्योगिक क्षमता, शैक्षणिक संस्था आणि पर्यटनाची समृद्ध परंपरा यामुळे हे शहर देशातील अग्रगण्य शहरांमध्ये स्थान मिळवू शकते. सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट आणि 'मित्र' संस्थेच्या सहकार्यामुळे २०४७ पर्यंत विकसित, आधुनिक आणि नागरिक-केंद्रित शहर घडविण्याचे स्वप्न निश्चितपणे साकार होईल.'

स्थायी समिती सभापती अनिल मकरिये म्हणाले, 'विकास म्हणजे केवळ पायाभूत सुविधा उभारणे नव्हे, तर भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शहराची मजबूत पायाभरणी करणे होय. सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिटमुळे विकासकामांना निश्चित दिशा, पारदर्शकता आणि गती मिळेल. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या समन्वयातून छत्रपती संभाजीनगर विकासाचे आदर्श मॉडेल ठरेल.'



आयुक्त अमोल येडगे म्हणाले, 'शहर विकासासाठी दूरदृष्टी, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया ही काळाची गरज आहे.

सिटी ट्रान्सफॉर्मेशन युनिट हे भविष्यातील शहर नियोजनाचे 'थिंक टँक' म्हणून कार्य करेल. 'मित्र' संस्थेच्या तांत्रिक सहकार्यामुळे शहरासाठी जागतिक दर्जाचा विकास आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करता येईल.'

**छत्रपती संभाजीनगरची बलस्थाने**

जागतिक वारसा लाभलेल्या अजिंठा-वेरूळ लेण्या, दौलताबाद किल्ला, बीबी का मकबरा, विकसित होत असलेले औद्योगिक क्षेत्र, उत्कृष्ट शैक्षणिक संस्था, वाढती गुंतवणूक क्षमता आणि भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान यामुळे छत्रपती संभाजीनगर हे महाराष्ट्रातील सर्वाधिक विकासक्षम शहरांपैकी एक आहे. या सर्व क्षमतांचा प्रभावी वापर करून शहराला उद्योग, पर्यटन, शिक्षण आणि तंत्रज्ञान क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा महानगरपालिकेचा निर्धार असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

# चंचु प्रयोग?; क्षणिक समाधानासाठी हायड्रोलीक टेस्टिंग न करता पाणी पुरवठा घातक ठरेल-राजेंद्र दाते पाटील

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- नक्षत्रवाडी ते हर्सूल १५०० मिमी पाइपलाइन द्वारे पाणी दाखल झाल्याचा गावगवा होत आहे परंतु हायड्रोलीक टेस्टिंग न घेणेअत्यंत चुकीचे असुन असे कुठलही क्षणिक सुखाचे प्रयोग मनपा आणि नागरिकांसाठी कायम स्वरूपी घातक ठरतील असे प्रतिपादन जेष्ठजल अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे. मुबलक व वक्ताशीर पाणी पुरवठा व्हावा म्हणून त्यांनी सर्व प्रथम जनहीत याचीका केली होती गेली तीन दशका पासुन ते लढा देत आहे हे विशेष होय.

उलट हायड्रोलीक टेस्टिंग न करता ही योजना ताब्यात घेणे ही प्रक्रिया बारकाईने पाहिले नाही तर यातील गळतीचा शोध भविष्यात कधीच लागणार तर नाहीच उलट भविष्यात पाण्याचे प्रेशर मेंटेन न झाल्यामुळे पाईप लाईन फुटतील आणि मग याचा ' ठिकरा ' मनपा वर सतत फुटत राहील पर्यायाने पाणी पुरवठा विभागा वर राहील.

ही घाई म्हणजे ' एका महिन्याची घाई,आयुष्यभर संकटात नेई ' असे होणार हे निश्चित असुन उदाहरण द्यायचे झाल्यास जालना अंबड पाणीपुरवठा योजनेची पाईपलाईनला महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने घेतली पाईप लाईनचे आत मधून अस्तरीकरण केले नव्हते.तीन वर्षा नंतर जलवाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे.लाभार्थी लोकांच्या ' पाणी द्या पाणी द्या ' या घाईमुळे ते तसेच राहून जाणार आहे. तीन वर्षानंतर जलवाहिनीला पत्रा पातळ होऊन छिद्र पडण्यास सुरुवात झाली. त्यामुळे अशा प्रकारची घाई करणे अत्यंत चुकीचे आहे. घाई करूनही छत्रपती संभाजीनगर शहराला पाणी भेटणार नाही हे विशेष ठरणार आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरासाठी अत्यंत महत्त्वाची असलेल्या नव्या पाणी पुरवठा योजनेची प्रत्यक्ष चाचणी यशस्वी झाली अशी घोषणा अयोग्य व अतांत्रिक ठरणारी असुन तीन दशकाच्या दीर्घ प्रतीक्षे नंतर अखेर नव्या योजनेचे पाणी शहरात दाखल झाले हे भासवण्याचा प्रयत्न म्हणजे ही योजनाच गर्ततेत आणण्याची सुरुवात झाली असे म्हणता येईल, म्हणुन सावध गिरी बाळगणे आवश्यक आहे.

सिडको एन-५ मधील पाणी टाकीत हे पाणी सोडून त्याचे वितरण सुरू केले असे म्हणणे म्हणजे सिडकोतील तीव्र पाणीटंचाईचा प्रश्न बऱ्याच अंशी मार्गी लागणार ही फक्त घोषणाचं ठरेल कारण नक्षत्रवाडी ते हर्सूल ही १५०० मिमी व्यासाची १७.९० किमी जलवाहिनी टाकण्यात आल्याचे सांगितले जात असुन त्यापैकी सिडको एन-१ मधील पिरॅमिड चौका पर्यंतची पाईप लाईन स्वच्छ करून तयार करण्यात आली हे म्हणण्या पूर्वी प्रशासनाने या पाईपची लाईनची हायड्रोलीक टेस्टिंगच केलेली नाही -अशा स्थितीत ही तांत्रिक चुक ' गुत्तेदाराची 'की 'महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 'की 'मनपाची 'की सगळे चुपचाप सहन करणाऱ्या जनतेची? असा महत्वाचा सवाल जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर उपस्थित केला आहे.

नुकतेच २२ जुलै २०२६ रोजी पिरॅमिड चौकातील व्हॉल्व्ह उघडून सिडको एन-५ च्या जलकुंभ २ व ३मध्ये पाणी सोडण्यात आले. यादरम्यान जुन्या योजनेचा पाणीपुरवठा सुरळीत राहणार असल्याने नव्या योजनेतून मिळणारा हा पाणीपुरवठा अतिरिक्त असणार असल्याचा दावा केला गेला आहे.

लोक प्रतिनिधी विभागीय आयुक्त जी.श्रीकांत,नवखे मनपा आयुक्त अमोल येडगे, एमजेपीच्या मुख्य अभियंता मनीषा पलांडे,जीव्हीपीआर चे प्रकल्प प्रमुख महेंद्र गुगलोथ यांची या वेळी उपस्थिती होती.

तीन दशका नंतर शहरात नवीन पाणी योजना प्रत्यक्षात येण्यासाठी लागले असे म्हणत पाण्याची बेरीज दाखवताना ४ एमएलडी पाणी सध्या एन-५ मधील टाक्यात दररोज दिवसा तून तीन वेळा भरता येतील १५०० मिमी नक्षत्रवाडी ते हर्सूल टाकलेल्या मुख्य पाइपलाइनचा व्यास आहे.

जास्तीत जास्त ३५ एमएलडी पाणी एकावेळी जलवाहिनीतून पाणी पुरवठा होणार असे चित्र उभे होत असुन १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना पर्यंत १० जलकुंभा पर्यत पोहचवण्याचे मनपा प्रशासनासचे लक्ष असल्याचे चित्र उभे होत असुन सावध पवित्रा बाळगून सन्माननीय न्यायालयाने अविरत केलेला पाठपुरावा प्रशासनाचे कळत असूनही अतांत्रिक प्रयत्न आणि गोरगरीब नागरिकांनी पाळलेला प्रचंड संयम यांची सांगड घालुन मनपा व प्रशासन काय संदेश देण्याचा प्रयत्न करीत आहे हे त्यांनाच ठाऊक एक दोन दिवस पाणी पुरवठा मागे पुढे होणे म्हणजे यशस्वी वाटचाल आहे असे कसे म्हणता येईल?असा महत्वाचा सवाल जेष्ठ जलअभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी प्रशासना समोर उपस्थित केला आहे.

विशिष्ट भागातील पाणी देण्याच्या स्थितीत या नवीन योजनेतून जास्तीचे पाणी उपलब्ध होईल हा दावा काय फक्त सात -आठ दिवसा आड होणाऱ्या पाणी पुरवठ्या च्या टप्प्यात एक ते दोन दिवसांची घट या साठी प्रशासन करत आहे काय? आणि ही प्रशासनाच्या वतीने फक्त शक्यता वर्तविली जात आहे असे स्पष्ट झाले आहे.

# संत बहिणाबाई कन्या प्रशालेच्या मुलींचा पायी दिंडी सोहळा



वैजापूर /शिवूर दि.२४ (प्रतिनिधी)- तालुक्यातील शिवूर येथील कन्या प्रशालेच्या मुलींनी शाळेतून संत बहिणाबाई मंदीर पर्यन्त आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येवर शुक्रवार(ता-२४) रोजी पायी दिंडी काढून संपूर्ण शिवूर वासीयांना पंढरपूरच्या आषाढी एकादशीची जाणीव जागृती करून दिली.

या दिंडीत वैजापूरचे माजी शिक्षणाकारी धोंडीरामसिंह राजपूत व मेजर गौतम अशोक गायकवाड यांनी सहभागी होऊन या चिमुकल्या मुलां-मुलीं सोबत दिंडी चा आनंद घेतला.पालखी, विणेकरी, टाळ, मृदुन्ग व वारकरी पोषाखातील मुलं.-मुली यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. शिवूर येथील बहिणाबाई यांच्या मंदिरात ही पालखी पायी दिंडी आली होती

संत बहिणाबाई कन्या प्रशालेचे सर्व शिक्षक वृंद .स शि. योगिता राजपूत, व त्यांचे सर्व सहकारी यांनी आषाढी एकादशीच्या पूर्व संध्येवर काढलेल्या या पायी दिंडीचे सर्वांनी तोंडभरून कौतुक केले.

## विनम्र चातुर्मास-२०२६ निमित्त भव्य मंगल कलश स्थापना, शोभायात्रा व महाप्रसादाचे आयोजन

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत व श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, राजाबाजार यांच्या वतीने 'विनम्र चातुर्मास-२०२६' निमित्त रविवार, २६ जुलै २०२६ रोजी परम पूज्य उच्चारणाचार्य १०८ आचार्य श्री विनम्रसागरजी महामुनिराज (१९ पिच्छी ससंघ) यांच्या पावन सान्निध्यात भव्य मंगल कलश स्थापना सोहळा, शोभायात्रा व महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने सकल दिगंबर जैन समाजासाठी हा अत्यंत गौरवाचा, धार्मिक व पुण्यप्रद प्रसंग असून समाजबांधवांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

रविवारी दुपारी १२.१५ वाजता श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, राजाबाजार येथून मंगल कलश, बँड, ढोल-ताशे व जयघोषाच्या वातावरणात भव्य शोभायात्रेला प्रारंभ होईल. ही शोभायात्रा राजाबाजार जैन मंदिर – शाहगंज – संस्थान गणपती मार्गे श्री गणधर वलय विधान निर्मित हीराकाका प्रांगण येथे पोहोचेल.

त्यानंतर दुपारी १२.४५ वाजता श्री गणधर वलय विधान निर्मित हीराकाका प्रांगण येथे परम पूज्य आचार्य श्री विनम्रसागरजी महामुनिराज यांच्या मंगल सान्निध्यात मंगल कलश स्थापना सोहळा संपन्न होईल. या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन विधानाचार्य श्री संदीप भैय्या करणार असून देशातील प्रख्यात जैन संगीतकार श्री सुधीरजी जैन (उज्जैन) व त्यांच्या संपूर्ण टीमकडून भक्तिमय संगीतमय सादरीकरण होणार आहे. यावेळी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत महाप्रसादीचे आयोजन करण्यात आले असून ती श्री गणधर वलय विधान निर्मित श्री हीराचंद कस्तूरचंद कासलीवाल (हीराकाका) प्रांगण, राजाबाजार येथे होईल. महाप्रसादीचे दाते म्हणून गुप्तदान दाता परिवार, स्व. सौ. हेमलता जैन यांच्या प्रथम पुण्यस्मृतीनिमित्त समाजसेवी पत्रकार एम. सी. जैन, डॉ. राजेशजी दिनेशजी पाटणी परिवार (चिकलठाणा) तसेच श्री शैलेन्द्रकुमारजी, राजेशकुमारजी, मयूरजी व सीए प्रणयजी सेठी परिवार (चौराहा) यांनी सहकार्य केले आहे.

## भारतीय सीमा सुरक्षा जवान व सी.आर.पी.एफ जवानांची देशभक्ती व राष्ट्रनिष्ठा अनमोल राष्ट्रीय सेवा-हभप पांडुरंग महाराज चिकटगावकर

वैजापूर/शिवूर दि.२४ (प्रतिनिधी)- तालुक्याचे भूमिपुत्र व शिवूर गावचे रहिवासी अमर शहीद जवान कै.विजय भाऊसाहेब देशमुख यांनी देशाच्या सीमेवर केलेली मातृभूमीची सेवा ही अनमोल राष्ट्रीय सेवा होय,त्यांची राष्ट्रभक्ती, राष्ट्र सेवा ही वैजापूर व शिवूर वासीयांच्या स्मरणात चिरकाल राहिल त्यांच्या या सेवेला मनापासून साष्टांग कुर्निसात असे गौरवपूर्ण उदगार हभप पांडुरंग महाराज चिकटगावकर यांनी शुक्रवार (ता.२४) रोजी श्री. संत बहिणाबाई मंदिरात स्व,विजय देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करताना काढले.

ते पुढे म्हणाले की,जवान कै. विजय देशमुख यांच्या आई व वडिलांनी त्यांना बालपणीच देशसेवेचे सुसंस्कार यांना शिकविले होते.या प्रसंगी ऑल इंडिया पॅरामिलिटरी फोर्सेस असोसिएशन वैजापूर चे सचिव मेजर गौतम अशोक गायकवाड यांनी ही कै,विजय देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करीत त्यांच्या सेवेचा गौरव केला व देशमुख परिवाराला आश्वासन दिले की,आपल्या कोणत्याही अडचणी असो त्या आमची संघटना सोडविण्यासाठी तत्पर सहकार्य करेल,वैजापूरचे माजी शिक्षणाधिकारी तथा सामाजिक कार्यकर्तेधोंडीरामसिंह राजपूत यांनी ही भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करून जवान स्व. विजय देशमुख यांच्या राष्ट्रीय, सामाजिक,व धार्मिक सेवेचा गौरव करीत श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी सुभाष जाधव, बबन तात्या,वाल्मिक जाधक,शिरीष चव्हाण, यांनीही भावपूर्ण आदरांजली अर्पण केली.

# स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या जयंती निमित्त अभिवादन

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या वतीने आज स्वातंत्र्यसेनानी पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या जयंती निम्मित अभिवादन करण्यात आले.

पैठण गेट येथील गोविंदभाई श्रॉफ यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास मा महापौर श्री समीर राजुरकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




यावेळी मा.स्थायी समिती सभापती अनिल मकरिये,नगरसेवक सचिन खैरे,ऋषिकेश जैस्वाल आयुक्त अमोल येडगे,सहायक आयुक्त रमेश मोरे, वॉर्ड अभियंता आरती नवगीरे,माहिती व जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, रविंद्र खरात, अतुल बनकर,संतोष कोठाळे, करण साळवे आदींची उपस्थिती होती.

# आदेश देणारे संविधानापेक्षा मोठे झालेत का? म्हणत दिल्ली पोलीस अन् सत्ताधाऱ्यांवर राज ठाकरेंची सडकून टीका

मुंबई दि.२४ (प्रतिनिधी)- नीट पेपर फुटी प्रकरणी दिल्लीत सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर पोलीसांकडून अमानुषपणे लाठ्या चालवल्या जात आहेत. अश्रूधूरांची नळकांडी फोडली जात आहेत, तरुणांची डोकी फोडली जात आहेत तर विद्यार्थिनींच्या अंगावर हात टाकण्या इतपत पोलीसांची मजल गेली. दिल्ली पोलीसांच्या या निर्दयीपणाबद्दल देशभरात संतापाची लाट उसळली आहे.

विरोधकांकडून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. केंद्र सरकार मात्र यावर मूग गिळून गप्प बसले आहे. विद्यार्थ्यांचे दिल्लीतील आंदोलन दिवसेंदिवस चिघळत आहे. पोलीसांकडून विद्यार्थ्यांवर होणारा अत्याचार थांबत नसल्याने हे आंदोलन उग्र स्वरूप घेत आहे. दिल्ली पोलीसांची विद्यार्थ्यांना होणारी अमानुष मारहाण आणि तसे आदेश देणारे सत्ताधारी यांच्यावर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सडकून टीका केली आहे. विद्यार्थ्यांची डोकी फोडण्याचे आदेश कोणी दिले? ते देणारे संविधानापेक्षा मोठे झाले आहेत का? असा सवाल राज ठाकरे यांनी आपल्या फेसबुक पोस्टमध्ये केला आहे.

मला एक प्रश्न पडला आहे. जर शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मारलं तर त्यांच्यावर कारवाई होते, तर मग दिल्लीत विद्यार्थ्यांना मारहाण करणाऱ्या पोलीसांवर आणि तसे आदेश देणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? दिल्लीत सध्या जे विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू आहे, त्या आंदोलनाला हाताळताना विद्यार्थ्यांवर सर्रास लाठीचार्ज केला जात आहे. हा लाठीचार्ज अगदी हलक्या स्वरुपात गर्दी पांगवण्यासाठी केला जात असता तरी एक वेळ ठीक, पण हा म्हणजे कुठलातरी सूड उगवल्यासारखा केला जात आहे.

जे व्हिडीओज समोर येत आहेत त्यात फक्त आंदोलनकर्ते विद्यार्थीच नाही तर आसपास असणाऱ्या अनेकांना सर्रास तुडवलं जात आहे. आणि पोलीस अशी कृत्य करत आहेत याचा अर्थ त्यांना असे आदेश आल्याशिवाय तर हे होऊच शकत नाही. मुळात आंदोलन का झालं? तर ऊं परीक्षेत गोंधळ झाला. ज्याचा फटका लाखो विद्यार्थ्यांना बसला त्या रागातून ही मुलं रस्त्यावर उतरली. त्यांच्या समर्थनार्थ इतर विद्यार्थी पण उतरले. थोडक्यात हे आंदोलन विद्यार्थ्यांनी उभं केलं, मोठं केलं. मग विद्यार्थ्यांना मारण्याचं कारण काय होतं? आणि हा अधिकार पोलीसांना दिलाच कोणी? विद्यार्थ्यांना मारण्याची जशी शिक्षकांना परवानगी नाही तशी ती पोलीसांना पण नाही. पण तरीही हे का केलं गेलं? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

पूर्वी शाळेत शिक्षक विद्यार्थ्यांना सर्रास मारायचे. ज्याच्यावर पुढे बंधनं आली, कारण न्याय व्यवस्था सोडली तर विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षा करण्याचा अधिकार कोणालाच नाही. मग हाच न्याय पोलीसांना का नाही? मी अनेकदा सांगत आलो आहे आणि आजदेखील हेच म्हणेन, महाराष्ट्रातले पोलीस असोत की इतर कुठलेही त्यांना जी कृती करायला सांगितली जाते ती करणे याशिवाय त्यांच्यापुढे पर्यायच नसतो. त्यामुळे त्यांना सर्वस्वी दोषी ठरवता येत नाही. पण जी व्यवस्था त्यांना हे निर्दयीपणे मारण्याचे आदेश देते त्यांना कोणी अधिकार दिले? ते संविधानापेक्षा मोठे आहेत का?

युनायटेड नेशन्सचे काही महत्त्वाचे नियम आहेत. ते म्हणजे, जेंव्हा केव्हा बळ वापरायची वेळ येईल त्यासाठी केली जाणारी कृती संविधानक असली पाहिजे. आवश्यक असेल तरच झाली पाहिजे. ती प्रमाणात असली पाहिजे. त्याचं उत्तरदायित्व हवं. आज नॉर्वे, जर्मनी, स्वीडन, फिनलंड, डेन्मार्क, न्यूझीलंड या देशांमध्ये अशा पद्धतीने पोलीसी बळाचा वापर झाला तर त्याची कठोर चौकशी होते. आणि त्या चौकशीचा रोख हा आदेश देणाऱ्यांकडे जास्त असतो. हेच आपल्याकडे पण व्हायला हवं.

हे कोण करेल असा प्रश्न आहे. पहिल्यांदा देशाचे सरन्यायाधीश या मुलांना झुरळ म्हणणार आणि मग हेच देशातील सर्वोच्च न्यायालय आम्हाला हे मारहाणीचे व्हिडीओज बघायला वेळ नाही सांगणार. हे अजब आहे. त्यांना नक्की कशासाठी वेळ आहे मग हा प्रश्नच आहे. सध्याच्या सरकारकडून अपेक्षाच उरल्या नाहीत म्हणून तरुण तरूणींना रस्त्यावर उतरावं लागत आहे. त्यामुळे याचा विचार सिव्हिल सोसायटीने करायला हवा. यावर चर्चा व्हायला हवी. खासदारांनी संसदेत यावर चर्चेचा आग्रह धरला पाहिजे. प्रश्न राज्याकडे नागरिकांवर बळ वापरण्याचा अधिकार आहे की नाही, हा नाहीच आहे. तो अधिकार जवळपास प्रत्येक राज्याकडे असतो. खरा प्रश्न असा आहे की, घटनात्मक लोकशाही स्वत:च्या अधिकारावर संयम ठेवण्याची क्षमता दाखवते का? लोकशाहीची परिपक्वता विरोध किती कठोरपणे दडपला जातो यावर ठरत नाही; तर विरोधाचा आवाज कसा संयमाने आणि पुढच्या परिणामांचा विचार करत हाताळते हा आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले आहे.

## पिंपरी चिंचवड मधील पाणीकपात रद्द करण्याची नगरसेविका अनिता काटे यांची मागणी

पिंपळे सौदागर दि.२४ (प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसाची स्थिती लक्षात घेता पवना धरणातील पाणीसाठा कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महापालिकेने लागू केलेली १५ टक्के पाणी कपात आता तातडीने रद्द करून नागरिकांना नियमित, पुरेसा आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी पिंपळे सौदागर प्रभाग क्रमांक २८ च्या नगरसेविका अनिता संदीप काटे यांनी महापालिका आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्याकडे केली आहे.

महापालिकेने पाणी कपात लागू केल्यानंतर शहरातील विविध भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या निर्माण झाली असून, अनेक नागरिकांनी अपुरा व अनियमित पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी केल्या आहेत. विशेषतः पिंपळे सौदागर प्रभाग क्रमांक २८ मधील नागरिकांना पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे नगरसेविका काटे यांनी निवेदनात नमूद केले आहे. सध्या पावसाने चांगली हजेरी लावल्यामुळे पवना धरणातील पाणीसाठा सुमारे ९० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे १५ टक्के पाणी कपात कायम ठेवण्याचे कारण उरलेले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक

लोकविजय

(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)

हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.

: संपादक :

राजेंद्र पांडुरंग रांजणीकर

मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५

e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.

(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# स्थानिकांना रोजगारात प्राधान्य, कौशल्य विकास केंद्र भारण्यासाठी सामंजस्य करार करा-उद्योग मंत्री उदय सामंत

## शेंद्रा बिडकीन औद्योगिक वसाहत आढावा बैठक




छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- प्रकल्प बाधीत शेतकरी व स्थानिकांना उभारल्या जाणाऱ्या उद्योगांमध्ये रोजगारासाठी प्राधान्य देणे हेच शासनाचे धोरण आहे. त्यासाठी कौशल्य विकास केंद्र तयार करून प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करावे, त्यासाठी टोयोटा किर्लोस्कर यांच्याशी सामंजस्य करार करावा,असे सुस्पष्ट निर्देश उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिले.

येथील ऑरिक सिटी सभागृहात उद्योग मंत्री सामंत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजीत करण्यात आली. बैठकीत प्रकल्प बाधित शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

खा. संदीपान भुमरे, आ. अनुराधा चव्हाण, आ. विलास भुमरे, उपमहापौर राजेंद्र जंजाळ, महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या. चे व्यवस्थापकीय संचालक पी. डी. मलिकनेर, महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळच्या सह. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मुख्य अभियंता राहुल बनसोड, अधीक्षक अभियंता रमेशचंद्र गिरी, प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, उप अभियंता नितिन जाधव, कार्यकारी अभियंता नागोराव राठोड,महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या. चे प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक करुणा खरात, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना तसेच स्थानिक शेतकरी यावेळी उपस्थित होते.

ऑरिक सिटी औद्योगिक वसाहतीत समाविष्ट शेंद्रा व बिडकीन क्षेत्रातील शेतकरी प्रकल्पबाधीत झाले आहेत. त्यांना देण्यात येणारा मोबदला व अन्य प्रश्न मार्गी लागले आहेत. त्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने मंत्रीमहोदयांचे आभार मानण्यात आले. त्यांचे उर्वरित प्रश्न निकाली काढण्यासाठी लवकरात लवकर निर्णय घेतले जातील,असे श्री. सामंत यांनी शेतकऱ्यांना सांगितले.

श्री.सामंत म्हणाले की,शेंद्रा आणि बिडकीन येथील औद्योगिक वसाहती मध्ये प्रत्येकी २ एकर क्षेत्र पोलीस स्टेशन साठी राखीव ठेवावे.

या क्षेत्रात स्थानिक राहिवासी, प्रकल्प बाधित शेतकरी यांची मुले-मुली यांना उद्योगामधील रोजगारात प्राधान्य देण्यात यावे, हेच शासनाचे धोरण आहे. उद्योगांना लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्यासाठी जागतिक दर्जाचे स्वतंत्र कौशल्य विकास केंद्र तयार करणे आवश्यक आहे. याठिकाणी टोयोटा-किर्लोस्कर च्या सहभागाने तयार होत असलेल्या कौशल्य विकास केंद्रात डी. एम. आय. डी. सी. चा सहभाग असावा. त्यासाठी त्यांच्याशी सामंजस्य करार करा. त्याद्वारे स्थानिकांना प्रशिक्षित करून रोजगार संधी देण्यासाठी प्राधान्य द्यावे, असे निर्देश श्री. सामंत यांनी दिले.

प्रकल्प बाधीत क्षेत्रातील भूमिहीन, अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या कृषी मजुरी मोबदल्याचा प्रश्नही सानुग्रह अनुदान देऊन तात्काळ निकाली काढावा,शेंद्रा बिडकीन औद्योगिक वसाहतीत क्रीडा संकुल ही डी. एम. आय. सी. ने तयार करावे, असे निर्देश श्री. सामंत यांनी दिले.

# उद्योग संघटनाशी चर्चा; सूक्ष्म, लघु उद्योगांना सुयोग्य पद्धतीने भूखंड वाटप करा-उद्योग मंत्री उदय सामंत



छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- शेंद्रा बिडकीन औद्योगिक वसाहतीत सूक्ष्म व लघु उद्योगांना समन्यायी व सुयोग्य पद्धतीने भूखंड उपलब्ध करून द्यावे,असे निर्देश उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे दिले.

येथील ऑरिक सिटी सभागृहात उद्योग मंत्री सामंत यांनी उद्योग संघटनाशी संवाद साधला. बैठकीत उद्योजकांच्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली.

खा. संदीपान भुमरे, आ. रमेश बोरनारे, आ. अनुराधा चव्हाण, आ. विलास भुमरे,उपमहापौर राजेंद्र जंजाळ, महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या. चे व्यवस्थापकीय संचालक पी. डी. मलिकनेर, महाराष्ट्र उद्योग विकास महामंडळच्या सह. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., मुख्य अभियंता राहुल बनसोड, अधीक्षक अभियंता रमेशचंद्र गिरी, प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, उप अभियंता नितिन जाधव, कार्यकारी अभियंता नागोराव राठोड,महाराष्ट्र औद्योगिक वसाहत मर्या. चे प्रकल्प व्यवस्थापक अरुण दुबे, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक करुणा खरात, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना तसेच उद्योग संघटनाचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

चिकलठाणा,वाळूज,शेंद्रा व बिडकीन औद्योगिक क्षेत्रात ट्रक टर्मीनस सुरु करण्यात यावे, अशी मागणी उद्योजकांनी केली. त्यावर श्री. सामंत यांनी सांगितले की, संघटनानी सहभाग द्यावा व ट्रक टर्मिनस उभारावे. सहयोग तत्वावर चालवावे, असे श्री. सामंत यांनी शेतकऱ्यांना सांगितले. उद्योजकांच्या वीज पुरवठ्याच्या मागणी बाबत श्री.सामंत म्हणाले की, यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी औद्योगिक वसाहतीतील वीज वितरणाचा प्राधान्यक्रम ठरवून द्यावा. शेंद्रा बिडकीन वसाहतीत सूक्ष्म, लघु उद्योगंना भूखंड देण्याबाबत त्वरित निर्णय घेऊन, उच्चतम दर निश्चिती करावी, जेणेकरून उद्योजकांना भूखंड घेता येतील. तसेच एक्झिबीशन सेंटरच्या कामाला गती द्यावी, असे निर्देशही श्री. सामंत यांनी दिले.

# जल जीवन मिशन कामाच्या चौकशीला विलंब; तक्रारीनंतरही प्रशासनाकडून हालचाल नाही

## चौकशी न झाल्यास उच्च न्यायालयात धाव घेणार; ॲड. सुनील बगाटे यांचा इशारा

हिंगोली दि.२४ (प्रतिनिधी)- औंढा नागनाथ तालुक्यातील मौजे जडगाव येथे जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सुमारे १.३४ कोटींच्या ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या कामात कथित अनियमितता झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, हिंगोली यांच्याकडे दाखल करण्यात आली असून, तक्रार दाखल करूनही बराच कालावधी उलटून गेला असतानाही अद्याप कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू न झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, सार्वजनिक निधीतून राबविण्यात आलेल्या [illegible] पारदर्शकतेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

तक्रारीनुसार, जल जीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेल्या विविध कामांमध्ये गंभीर स्वरूपाच्या त्रुटी असून त्यांची स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी करणे आवश्यक आहे. यामध्ये निकृष्ट दर्जाचे बांधकाम, शासकीय जमीन उपलब्ध असतानाही विहिरीसाठी खाजगी जमिनीचा वापर, गावापासून दूरस्थ ठिकाणी विहिरीचे बांधकाम तसेच योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान झालेल्या कथित प्रशासकीय व तांत्रिक अनियमितता यांसारख्या बाबींचा समावेश असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदारांनी जिल्हा प्रशासनाकडे या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक व प्रशासकीय चौकशी करण्याची मागणी केली असून, चौकशीत दोषी आढळणारे संबंधित अधिकारी, कंत्राटदार तसेच ग्रामपंचायतीशी संबंधित जबाबदार व्यक्तींवर शासकीय नियमांनुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. सार्वजनिक निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने होणे अपेक्षित असताना अशा स्वरूपाच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही होणे आवश्यक असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, तक्रार दाखल होऊनही संबंधित विभागाकडून कोणतीही प्रत्यक्ष चौकशी सुरू झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक हिताशी निगडित महत्त्वाच्या योजनेबाबत आलेल्या तक्रारींवर प्रशासनाने त्वरित निर्णय घेणे अपेक्षित असताना होत असलेल्या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असल्याची चर्चा गावात सुरू आहे.

या संदर्भात ॲड. सुनील बगाटे यांनी सांगितले की, जल जीवन मिशनसारख्या महत्त्वाच्या योजनेत सार्वजनिक निधीचा वापर झाला असल्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. प्रशासनाने तक्रारीची गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ चौकशीचे आदेश द्यावेत, अशी त्यांची मागणी आहे. जर जिल्हा प्रशासनाने यापुढेही चौकशी सुरू केली नाही, तर न्याय मिळविण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या प्रकरणात जिल्हा प्रशासनाकडून अद्याप अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नसून, संबंधित तक्रारीवर पुढे कोणती कार्यवाही केली जाते, याकडे जडगावसह संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# छत्रपती संभाजीनगरला मराठी भाषा विकास केंद्र सुरु करणार-उद्योग मंत्री उदय सामंत





छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- मराठी भाषेच्या विकासासाठी शासन पुढाकार घेत असून छत्रपती संभाजीनगर येथे हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने मराठी भाषा विकास केंद्र १० कोटी रुपये खर्चून सुरु करीत आहे,अशी घोषणा राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज येथे केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज मराठी भाषा विभागाच्या वतीने आढावा बैठक व साहित्यिकांसमवेत संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आ. विलास भुमरे, ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम., पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, भाषा संचालनालयाचे संचालक अरुण गिते आदी उपस्थित होते.

साहित्यिक विरा. राठोड,गुलाबराव मगर आदी मान्यवरांनी आपले विचार मांडले. मान्यवर व्यक्तिंचे विचार ऐकल्यानंतर श्री. सामंत म्हणाले की, मराठी भाषेचा संस्कार हा घरातूनच व्हायला हवा. आपण लहान मुलांना मम्मी- पप्पा ऐवजी आई बाबा म्हणायला शिकवायला हवे. शासनाच्या पातळीवर आता प्रत्येक जिल्ह्यात मराठी भाषा कार्यालय सुरु करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात हे कार्यालय असेल एक स्वतंत्र मराठी भाषा अधिकारी असेल. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने छत्रपती संभाजीनगर येथे मराठी भाषा विकास केंद्र सुरु करण्यात येईल. त्यासाठी १० कोटी रुपये खर्चण्यात येतील. त्यासोबतच पुस्तकांचे गाव, कवितांचे गाव असे उपक्रम साहित्यिकांच्या गावी राबविवून त्यांच्या स्मृती जागविण्यात येतील. युवा साहित्य संमेलन, महिला साहित्य संमेलन, बाल साहित्य संमेलन अशा संमेलन उपक्रमांना चालना देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन बेहाडे यांनी केले.

# लोकसहभाग आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पुढाकारातून जीव्हीपी पॉईंटचे स्वच्छ, सुंदर व हरित परिसरात रूपांतर

छत्रपती संभाजीनगर दि.२३ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ङप्रभाग क्रमांक १६ अंतर्गत शिवाजी माध्यमिक विद्यालय परिसरातील जीव्हीपीचे यशस्वी निर्मूलन करून त्या ठिकाणी सौंदर्यीकरण व वृक्षारोपणाचा आदर्श उपक्रमङ उत्साहात राबविण्यात आला.

या उपक्रमात ङमाजी आमदार संजय केनेकर, महापौर समीर राजूरकर तथा आयुक्त अमोल येडगे आणि घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त नंदकिशोर भोंबे यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. जीव्हीपी मुक्त परिसर विकसित करून स्वच्छ, सुंदर, हरित व पर्यावरणपूरक शहर घडविण्याच्या महानगरपालिकेच्या प्रयत्नांना या उपक्रमामुळे अधिक बळ मिळाले.



यावेळी नगरसेवक रामेश्वर भादवे, राजू भाऊ वाडेकर, अनिकेत राठोड, स्वच्छता निरीक्षक विशाल खरात, हरीश लव्हेरा, जवान हरीश बनकर, अर्बन वेस्टच्या आयईसी टीमचे भूषण पाटील, क्लस्टर हेड प्रशांत पाटील, प्रभाग प्रभारी योगेश काकड, महेश गायकवाड तसेच शिवाजी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गौतम आढाव, शिक्षकवृंद, विद्यार्थी आणि नागरिकङ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमास विवेक धानुका यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या सहकार्यामुळे परिसराची आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली आणि 'जीव्हीपी निर्मूलन ते हरित सौंदर्यीकरण' हा संदेश प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला.

आयईसी टीमच्या सातत्यपूर्ण जनजागृती, महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे नियोजन, लोकप्रतिनिधी, नागरिक आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे पूर्वी कचऱ्याचा साठा होणाऱ्या जीव्हीपी पॉईंटचे रूपांतर स्वच्छ, सुंदर व हरित परिसरात करण्यात आले. हा उपक्रम लोकसहभागातून साध्य झालेल्या यशस्वी परिवर्तनाचे उत्कृष्ट उदाहरण ठरला असून, शहरातील इतर जीव्हीपी पॉईंटच्या निर्मूलनासाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धन ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगत अधिकाधिक वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन केले.

'स्वच्छ, सुंदर, हरित छत्रपती संभाजीनगर'ङ ही संकल्पना साकार करण्यासाठी महानगरपालिकेच्या अशा लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना नागरिकांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# स्मार्ट मीटर बसवले अन् वीजवापरावर साडेचार कोटींची सवलत मिळाली!

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलात पावणेतीन लाख ग्राहकांना लाभ

छत्रपती संभाजीनगर दि.२४ (प्रतिनिधी)- आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना विजेचा अचूक वापर कळतोय; शिवाय वापरावरही नियंत्रण ठेवता येतेय. विशेष म्हणजे घरगुती ग्राहकांना दिवसा वीजवापरावर महावितरण घसघशीत सवलतही देत आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील पावणेतीन लाख घरगुती ग्राहकांना आतापर्यंत साडेचार कोटी रुपयांहून अधिक रकमेची सवलत मिळाली आहे. ही सवलत मिळवण्यासाठी स्मार्ट टीओडी मीटर आवश्यक आहे. ते बसवण्यासाठी ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

राज्यात सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे. घरगुती ग्राहकांना २०२५ च्या जुलै महिन्यापासून सवलत मिळत आहे. टाईम ऑफ डे प्रणालीनुसार वीज वापराच्या कालावधीनुसार दर आकारणी केली जाते. औद्योगिकनंतर घरगुती ग्राहकांना प्रथमच स्वस्त वीज दरासाठी टीओडी (टाईम ऑफ डे) प्रमाणे आकारणी सुरू करण्यात आली. जुलै २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत ८० पैसे प्रतियुनिट सवलत मिळाली. यंदा ही सवलत ८५ पैसे प्रतियुनिट असून, पुढील तीन आर्थिक वर्षात ती वाढत जाणार आहे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात २ लाख ७५ हजार ३४ घरगुती ग्राहकांना जुलै-२०२५ ते जून-२०२६ या १२ महिन्यांच्या वीजबिलात ४ कोटी ५९ लाख ९ हजार रुपयांची टीओडी सवलत मिळाली. छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील ७५ हजार ६८१ ग्राहकांना १ कोटी ८७ लाख ५७ हजार रुपये, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील १ लाख ४० हजार १३४ ग्राहकांना १ कोटी ८४ लाख ७८ हजार रुपये तर जालना मंडलातील ५९ हजार २१९ ग्राहकांना ८६ लाख ७५ हजार रुपये सवलत मिळाली. नव्या तंत्रज्ञानाच्या मीटरचे रीडिंग ऑटोमॅटिक होत असल्याने अचूक बिले मिळून घरातील विजेचा वापर दर तासाला संबंधित ग्राहकांना मोबाईलवर पाहता येण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याद्वारे ग्राहकांचे वीजवापरावरही थेट नियंत्रण राहणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीजग्राहक घरातील प्रामुख्याने वॉशिंग मशीन, ओव्हन, गिझर, एअर कंडिशनर व इतर उपकरणांचा मोठा वापर करतात. त्यात टीओडी मीटरमुळे ग्राहकांचा मोठा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे महावितरणकडून हे स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहेत. ग्राहकांना अचूक व वेळेत वीजबिल देण्यास उपयुक्त ठरणारे अत्याधुनिक टीओडी वीजमीटर प्री-पेड नसून, पोस्टपेड आहेत. पूर्वीप्रमाणेच वीजवापरानंतरच ग्राहकांना वीजबिले मिळत आहेत. हे मीटर मोफत बसवण्यात येत असून, ग्राहकांना कुठलाही आर्थिक भुर्दंड बसणार नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. यात मानवी हस्तक्षेपाला अजिबात वाव नाही. दिवसा वीजवापराची सवलत मिळवण्यासाठी ग्राहकांनी टीओडी मीटर बसवण्यासाठी सहकार्य करावे तसेच अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी केले आहे.

(पान १ वरुन)

## महाराष्ट्रातील डॉ. मनोज शिरूरे यांना जामीन...

रात्रंदिवस अभ्यास करून परीक्षेची तयारी करतात.

सीबीआयने आपल्या तपासाचा हवाला देताना सांगितले की, डॉ. शिरुरे यांनी कुलकर्णीकडे आणखी दोन डॉक्टरांना पाठवले होते. ज्यांच्या मुलांनी प्रत्येकी तीन लाख रुपये देऊन रसायनशास्त्राची फुटलेली प्रश्नपत्रिका मिळवली होती. त्यामुळेच शिरुरेंच्या जामीन अर्जाला विरोध करत असताना सीबीआयने युक्तिवाद केला की, सदर प्रकरणाचा तपास एका निर्णायक टप्प्यावर आला असून यात डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार, कॉल रेकॉर्ड आणि मोठ्या कटाचे विश्लेषण समाविष्ट आहे. आरोपीची सुटका झाल्यास तपासावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

वरिष्ठ सरकारी वकील नीतू सिंह यांनी सीबीआयचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाइल फोनमधून रसायनशास्त्राचे १३६ हस्तलिखित प्रश्न आढळून आले. ज्यातील १११ प्रश्न नॅशनल टेस्टिंग एजन्सीने नीटसाठी तयार केलेल्या मुख्य प्रश्नसंचाशी जुळत होते.

ज्येष्ठ वकील नीतू सिंह यांनी असाही युक्तिवाद केला की, पेपरफुटीमुळे अनेक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. सरकारी तिजोरीचे ६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान झाले.

## पंतप्रधानांनी सभागृहात येऊन संपूर्ण...

करण्यात आली.

तिकडे, राज्यसभेतही सकाळी ११ वाजता कामकाज सुरू झाले. सुमारे पाच मिनिटांनंतर सभापतींनी सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याची प्रक्रिया सुरू केली. याच दरम्यान, विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे दिल्लीत आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवरील कथित पोलीस कारवाई आणि पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी उभे राहिले. गदारोळात कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले.

दुपारी १२ वाजता राज्यसभेची बैठक पुन्हा सुरू झाली. मल्लिकार्जुन खरगे यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र

## देशातील अनेक राज्यात विद्यार्थ्यांचा नीट...

राजस्थान उच्च न्यायालयाच्या जयपूर खंडपीठासमोर वकीलांनी केंद्र सरकारविरोधात धरणे आंदोलन केले. काँग्रेसच्या विधी विभागाशी संलग्न असलेल्या राजस्थान उच्च न्यायालयाच्या (जयपूर) वकिलांनी विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ पायी मोर्चा आयोजित केला. हा मोर्चा उच्च न्यायालयाच्या गेट क्रमांक ३ पासून आंबेडकर सर्कलपर्यंत सुरू राहिला. दरम्यान, विद्यार्थी नेता शुभम रेवाड जयपूरमधील राजस्थान विद्यापीठाच्या गेटवर उपोषणाला बसला आहे. आज त्यांच्या उपोषणाचा दुसरा दिवस आहे. विद्यार्थी त्यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करत आहेत. जयपूरच्या जवाहर सर्कल येथे जनरेशन-झेडचे सदस्यही आंदोलन करत आहेत.

उत्तर प्रदेशात कॉकरोच जनता पक्षाच्या (सीजेपी) समर्थनार्थ विद्यार्थी आणि वकील रस्त्यावर उतरले. प्रयागराजमधील वकिलांनी, 'ज्यांच्यावर लाठीचार्ज झाला, ती आमची मुले आहेत. आता लढा रस्त्यावर लढला जाईल,' अशी घोषणा करत मोर्चा काढला. मेरठमध्ये सपा कार्यकर्त्यांनी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची प्रतिकात्मक शवपेटी नेली. पोलिसांनी सपा कार्यकर्त्यांकडून ती प्रतिकात्मक शवपेटी हिसकावून घेतली आणि घेऊन गेले. यावेळी एक सपा कार्यकर्ता रस्त्यावर झोपला. पोलिसांनी त्याला उचलून नेले. कानपूरमध्ये सपाच्या एका आमदाराने ढोलक वाजवून आंदोलन केले. लखीमपूरमध्ये विद्यार्थी हातात तिरंगा आणि फलक घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पोहोचले.

## जंतरमंतर आंदोलनापासून विद्यार्थ्यांना लांब...

या ट्विटनंतर राहुल गांधी यांनी दिल्ली विद्यापीठाच्या ट्विटवरती हल्लाबोल केला आहे. त्यांनी म्हटलं आहे की, 'दिल्ली विद्यापीठाची जंतर मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना धमकावण्याची हिंमतच कशी झाली? लक्षात ठेवा, वेळ आल्यावरती यासाठी तुम्हाला जबाबदार धरलं जाईल.' दुसरीकडे, गेल्या २६ दिवसांपासून सोनम वांगचुक यांचं सुरू असलेलं आमरण उपोषण आज (२४ जुलै) मध्यरात्री सुटलं आहे. तर दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टीकडून कोणत्याही परिस्थितीमध्ये केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झाल्याशिवाय माघार घेणार नाही, असा इशारा देण्यात आला आहे. देशभरातील तरुणही दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर जमली असून त्या ठिकाणी गेल्या महिनाभरापासून मोठ्या ताकदीने आंदोलन केलं जात आहे.

## बांगलादेशात राजकीय भूकंप,...

नवीन राष्ट्रपतींची निवड होईपर्यंत संसदेचे अध्यक्ष हे हंगामी राष्ट्रपती म्हणून काम पाहतात. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे.

एका वृत्तानुसार, मोहम्मद शहाबुद्दीन यांनी काही दिवसांपूर्वी शेख हसीना यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला होता असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. यावरून मोहम्मद शहाबुद्दीन यांच्यावर तेथील सरकार नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे मोहम्मद शहाबुद्दीन यांच्यावर राजीनामा देण्यासाठी दबाव वाढला होता अशी चर्चा होती.